राज्यातील दूध उत्पादकांना दूध खरेदी दरात
वाढ व दूध सहकारी संघसंस्थांच्या
कमिशन दरात वाढ करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषि पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्र.एमएलके १००९/१८७९२/प्र.क्र.१४९/पदुम-८**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : ३१ डिसेंबर २००९**

**वाचा :-** १. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएलके-१००५/१२८१/प्र.क्र.१५/पदुम-८, दिनांक १३ जून २००६.
२. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएलके-१००५/१२८१/प्र.क्र.१५/पदुम-८, दिनांक ७ नोव्हेंबर २००७
३. शासन शुध्दिपत्र क्रमांक १००५/१२८१/प्र.क्र.१५/पदुम-८, दिनांक १५ मे, २००८
४. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक दुवियो-१००८/प्र.क्र.३०७/पदुम-९, दिनांक ३१ जानेवारी, २००९
५. कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्रमांक एमएलके-१००९/१०३७५/प्र.क्र.७१/पदुम-८, दिनांक १३ ऑगष्ट २००९
६. आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे पत्र क्र.आदुवि-९/दूध खरेदी दर/२००९/२०८४, दिनांक १७ नोव्हेंबर २००९.

**प्रस्तावना :-**

राज्यातील दूध संकलन शासन, सहकार व खाजगी क्षेत्रामार्फत होते. दूध खरेदी व विक्री दरात होणारी बाजारातील चढ उतार लक्षात घेऊन काही दूध संघ व बहुतेक खाजगी प्रकल्प दूध खरेदी व विक्री दरात बदल करुन त्यांच्याकडील दूध संकलन नियंत्रित करतात. परिणामी शासनाकडे होणा-या दूध पुरवठयावर परिणाम होऊन शासनाकडील दूध संकलन व वितरण यामध्ये नियोजन राखणे शक्य होत नाही. त्यासाठी ज्या प्रमाणात खुल्या बाजारात दूध खरेदी व विक्रीचे दर असतील त्याच्या आसपास शासनाचेही दूध खरेदी व विक्रीच्या दरात वाढ करणे आवश्यक होते. त्या अनुषंगाने खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**शासन निर्णय :-**

१. राज्यातील दूध उत्पादकांकडून खरेदी करण्यात येणा-या गाय/म्हैस दूध खरेदी दरात प्रतिलिटर १ रु. वाढ करण्यात येत आहे.
२. राज्यातील शासकीय दूध योजनांमार्फत विक्री होणा-या सध्याच्या गाय/म्हैस दरात प्रतिलिटर १ रु. वाढ करण्यात येत आहे.
3. राज्यातील सहकारी संघाना देण्यात येणा-या कमिशनमधील अंतर्गत वहातूकीपोटी १५ पैसे प्रतिलिटर वाढ (७५ पैसे प्रतिलिटर ऐवजी ९० पैसे प्रतिलिटर) करण्यात येत आहे. म्हणजेच

संघाचे कमिशन प्रतिलिटर रु.१.३५ ऐवजी प्रतिलिटर रु.१.५० इतके करण्यात येत आहे. तसेच संस्थेच्या कमिशनमध्ये प्रतिलिटर १५ पैसे वाढ करण्यात येत आहे. म्हणजेच संस्थेचे कमिशन ६५ पैसे प्रतिलिटर इतके करण्यात येत आहे.

उपरोक्त बदल दिनांक १.१.२०१० पासून पुढील आदेशापर्यंत अंमलात राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(पता कांबळे)
उपसचिव,महाराष्ट्र शासन
कृषि व पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

—

आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य,
प्रशासकीय इमारत, अब्दुल गफारखान मार्ग,
वरळी सीफेस, मुंबई-४०० ०१८.
दिनांक : ४.१.२०१०

आदुवि-९/दूध खरेदी दर वाढ/२०१०/ ४४

**विषय- राज्यातील दूध उत्पादकांना दूध खरेदी दरात वाढ व दूध सहकारी संघ संस्था यांच्या कमिशन दरात वाढ करणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन शासन निर्णयाची प्रत योग्य त्या कार्यवाहीसाठी देण्यात येत आहे.

उपआयुक्त (उ. व प्र.)
दुग्धव्यवसाय विकास विभाग

प्रति

१. महाव्यवस्थापक,बृहन्मुंबई दूध योजना,वरळी,मुंबई-४०० ०१८.
२. प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी,मुंबई/पुणे/नाशिक/अमरावती/औरंगाबाद/नागपूर.
३. ~~महाव्यवस्थापक~~/दुग्धशाळा व्यवस्थापक,शासकीय दूध योजना, नागपूर.
४. उपआयुक्त वित्तीय सल्लागार, दु.वि.वि., वरळी, मुंबई-१८.
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे दुग्ध वसाहत, मुंबई-४०० ०६५.
६. प्राचार्य, दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे, मुंबई-४०० ०६५.
७. प्रकल्प अधिकारी, दुग्ध प्रकल्प,दापचरी.
८. व्यवस्थापक, पालघर फार्म, पालघर.
९. सर्व जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी.